व्यापारी लिफाफा

औषध व प्रयोगशळा साहित्या पुरवठा करणे बाबत यादी

| अ.क्र. | औषधीचे नाव | नग | दर |
|---|---|---|---|
| १ | Tab Rifampicin 450 mg | १ नग | |
| २ | Tab Rifampicin 600 mg | १ नग | |
| ३ | Inj. Amikacin 500 mg | १ नग | |
| ४ | Inj. Amikacin 250 mg | १ नग | |
| ५ | Tab cycloserine 250 mg | १ नग | |
| ६ | Falcon tube | १ नग | |
| ७ | Sputum container | १ नग | |
| ८ | Weighing machine | १ नग | |
| ९ | Daimond marker | १ नग | |
| १० | Triple layer face mask | १ नग | |
| ११ | Sod.hypochloride | १ नग | |
| १२ | Measuring cylider 100 ml | १ नग | |

पुरवठा धारकांचे नांव
पुरवठ संस्थेचे नांव पत्ता

District Tuberculosis Officer
District T.B. Centre,Nasik.

# जाहीर नोटीस ( दरपत्रके आमंत्रण पत्र)

सुचित करण्यात येते की, जिल्हा क्षयरोग अधिकारी जिल्हा क्षयरोग केंद्र नाशिक या कार्यालयासाठी कार्यालयीन खर्चासाठी उपलबध्द होणाऱ्या अनुदानातून सोबत जोडलेल्या यादीतील औषध प्रायोगशाळा साहित्याचे आवश्यक वस्तूचे दर मागविण्याचे निश्चित केले आहे. तरी इच्छुक पुरवठाधारकांनी व्यापारी लिफाफा व खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधीत जिल्हा क्षयरोग केंद्र कार्यालय जिल्हा रुग्णालय आवार त्र्यंबक रोड येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी तसेच उपरोक्त इ.मेल द्वारे दरपत्रक, सादर केलचे अवगत करावे. मोहरबंद तांत्रिक व व्यापारी लिफाफा स्वतंत्र सादर करण्यात यावा.

## दरपत्रके सादर करणाऱ्यां पुरवठाधारकांसाठी सर्वसाधारण अटी शर्ती

१) इच्छुक पुरवठाधारकांनी बाबनिहाय (Itemwise) दरपत्रके मोहरबंद लिफाप्यात सादर करावीत. यावर सदर जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर सादर केलेले आहे.त्याचे नांव असावे.

२) एका पुरवठाधारकास बाबनिहाय फक्त एक दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्ये संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये. असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबंधाचा संघर्ष म्हणुन समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकरण्यात येतील. उदा. जर दोन कंपन्या एकाच बाबीसाठी / प्रकल्पासाठी / निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती ज " कंपनी एक्स " चा मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्या भागधारक असेल तीच व्यक्ती " कंपनी एक्स " चा मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्य भागधारक असेल तीच व्यकती " कंपनी वाय " ची मालक / संचालक / भागिदार / बहुसेख्य भागधारक नसावी.

३) यादीत विर्निदिष्ट औषधीचा पुरवठा करणे बाबतचा पुर्वानुभव दाखला जोडण्यात यावा.

४) आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्रमांक (GST Number) प्रमाणपत्र व पॅन कार्ड ची छायांकित प्रत सांक्षांकित करुन जोडावी.

५) संस्था / दुकान, साहित्य पुरवठा / औषध विक्रि विषयक वैध नोंदणी दाखला सोबत जोडावा.

६) दरपत्रके सादर करणेसाठी पत्ता / ठिकाण -जिल्हा क्षयरोग अधिकरी जिल्हा क्षयरोग केंद्र नाशिक जिल्हा रुग्णालय आवार त्र्यंबक रोड, नाशिक पिन कोड ४२२००२

७) यादी मधील नमुद वस्तू खरेदी केली जातील.

८) विहीत कालावधीत पुरवठा न झाल्यास शासकिय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

९) विहीत नमुन्यातल वस्तुव सेवा कर (GST Number)सहीत देयके स्विकारण्यात येतील, दर हे सर्व करांसहीत व उचल ठेव इमाली पोहच खर्चासहीत असावे.

१०) खरेदी केलेल्या बाबींची पोहच जिल्हा क्षयरोग केंद्र नाशिक येथे करावी लागेल.

११) मंजुर न्युनतम दरांवर पुरवठाधारकास पुरवठा करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने खरेदी करावी लागल्यास फरकाची रक्कम न्युनतम दर धारकाकडून वसुल केली जाईल.

१२) दर हे अधिकतम विक्री किंमतीपेक्षा (MRP) जास्त नसावे. वस्तू व सेवांच्या दराबाबत शासकिय खरेदी बाबतच्या मार्गदर्शक सुचना शासन निर्णय, परिपत्रक यांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१३) दैनंदिन वापराच्या साहित्याचा दर्जा हा सर्वोत्तम असावा. वस्तू हया आय एस आय मार्क किंवा आयएसआय मार्कशी समांतर दर्जाधारक असावा.

१४) इच्छुक पुरवठाधारकास कोणत्याही शासकीय विभागाने खरेदी प्रक्रियेसाठी काळया यादीत टाकले नसल्या बाबतचे प्रमाणपत्र लिहुन देणे बंधनकारक आहे.

१५) दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांका पासून आठ दिवस संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत ( कार्यालयीन सुटटी वगळून) उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१६) दरपत्रके उघडण्याची अंतिम मुदतिच्या ( आठव्या दिवशी) संध्याकाळी ५.१५ वा किंवा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली जाईल.

१७) दरपत्रकासोबत सादर करण्यात येणारे दस्तावेज (कागदपत्रे) राजपत्रित अधिकारी किंवाशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन सादर करावे.

१८) कोणतेही लेखी तोंडी कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपुर्ण अथवा काही भागांबाबत (काही वस्तुंबाबत) खरेदी प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे व खरेदीचे सर्व अधिकार जिल्हा क्षयरोग अधिकारी नाशिक यांनी राखुन ठेवले आहेत. मान्य न्युनतम दर एक वर्षासाठी वैध राहतील.

District Tuberculosis Officer
जिल्हा क्षयरोग केंद्र नाशिक
District T.B. Centre, Nasik.

प्रत - सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीस्तव सविनय सादर